**<u>दोषारोप</u>**

मी, श्रीमती एस. वाय. सुळ, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२, नेवासा, ता. नेवासा, जि. अहमदनगर खालीलप्रमाणे दोषारोप करीत आहे.

१. **योगेश सोपान खरात,**

वय – ४० वर्षे, व्यवसाय – मजूरी,

२. **ज्योती योगेश खरात,**

वय – ३५ वर्षे, व्यवसाय – मजूरी,

३. **सुरेखा लक्ष्मण खरात,**

वय – २५ वर्षे, व्यवसाय – मजूरी,

४. **रूख्मीणी उर्फ रखमाबाई सोपान खरात,**

वय – ६० वर्षे, व्यवसाय – घरकाम,

रा. यशवंतनगर,सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर.

<u>यांचेवर खाली नमुद केलेप्रमाणे आरोप ठेवते</u> –

तुम्ही दिनांक २५.०६.२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजेच्या सुमारास मौजे यशवंतनगर, सोनई, ता. नेवासा येथे फिर्यादीच्या घरासमोर आपसात संगनमत करून तुमच्यापैकी आरोपी क्र. १ याने फिर्यादीला लाकडी दांड्याने उजव्या हातावर मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत पोहचवली व त्यायोगे **भारतीय दंड संहिता कलम ३२४ सह कलम ३४** प्रमाणे प्रस्तुत न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रामध्ये येणारा गुन्हा केला आहे.

२. वरील दिवशी, ठिकाणी, वेळी तुम्ही आपसात संगनमत करून फिर्यादीला व त्याच्या पत्नीला लाथाबुक्यांनी व चापटाने मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत पोहचवली व त्यायोगे **भारतीय दंड संहिता कलम ३२३ सह कलम ३४** प्रमाणे प्रस्तुत न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रामध्ये येणारा गुन्हा केला आहे.

३. वरील दिवशी, ठिकाणी, वेळी तुम्ही आपसात संगनमत करून फिर्यादी व त्याच्या पत्नीला प्रक्षोभीत करेल आणि अशा प्रक्षोभनामुळे त्याच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा या उद्देशाने अपमान केला व **भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह कलम ३४** प्रमाणे प्रस्तुत न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रामध्ये येणारा गुन्हा केला आहे.

४. वरील दिवशी, ठिकाणी, वेळी तुम्ही फिर्यादी व त्याच्या पत्नीला दमदाटी करून जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारीपात्र धाकदपटशाचा अपराध केला व **भारतीय दंड संहिता कलम ५०६ सह कलम ३४** प्रमाणे प्रस्तुत न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रामध्ये येणारा गुन्हा केला आहे.

आणि याद्वारे मी असे निर्देश देत आहे की, उपरोक्त आरोपांबाबत या न्यायालयाकडून तुमची न्यायचौकशी करणेत येत आहे.

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.09.02 17:56:42 +0530

दिनांक–०२/०९/२०२५.
नेवासा

(**श्रीमती.एस.वाय.सुळ**)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, नेवासा

आरोपींवरील दोषारोप तयार करण्यात आले व त्यांना त्यातील मजकुर त्यांच्या भाषेत समजावून सांगणेत आला.

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.09.02 17:56:45 +0530

दिनांक– ०२/०९/२०२५.
नेवासा

(**श्रीमती.एस.वाय.सुळ**)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, नेवासा